भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2022 ◑ 10AA 211734

दस्ताचा प्रकार : **करार पत्र** अनुच्छेद : --
दस्त नोंदणी करणार आहात का? : -- दु.नि. कार्यालयाचे नाव : --
मिळकतीचे वर्णन: --
मोबदला रक्कम : --
मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव : **प्राचार्य, श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी**
ह. प्रकाश माने, रा. सदर
दुसऱ्या पक्षकाराचे नाव : --
मुद्रांक विक्री नं.: ४०६ दिनांक : ०४-०८-२०२२ **मुद्रांक किंमत रू.१००/-**

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही मुद्रांक विक्रेत्याची सही
मुद्रांक विक्रेत्याचे नाव : श्री.चवगोंडा भूपाल पाटील
पत्ता : ८/१४५, मेन रोड, इचलकरंजी परवाना क्र.१२/१९९४ कोड नं.२६०७०१८
**ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.**

Sub Treasury Office Ichalkaranji
26 JUL 2022
Sub Treasury Officer Ichalkaranji

# विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर शिकवणे तसेच इतर कौशल्यांचे प्रशिक्षण देणेबाबत करारपत्र

आज तारीख ३०/०८/२०२२ रोजीचे

| | |
|---|---|
| Shri N. B. Education Society's<br>Shri Venkatesh Mahavidyalaya, Ichalkaranji<br>Principal<br>Dr. V. A. Mane | लिहून घेणार पार्टी नं.१ |

(उपरोक्त पार्टीचा या विकसन करारपत्रामध्ये यापुढे संक्षिप्त रूपाने पार्टी नं.१ अथवा लिहून घेणार असा उल्लेख करणेत आलेला असून त्यामध्ये उपरोक्त पार्टीचा व तिचे ॲडमिनीस्ट्रेटर, व्यवस्थापक व सर्व प्रकारचे कायदेशीर इस्टेट वारसांचा अंतर्भाव करणे आलेला आहे.)

| | |
|---|---|
| Shri Samarth Education Society,<br>President, Sandip Dhondiram Kalyankar,<br>Ichalkaranji, Dist.: - Kolhapur | लिहून देणार<br>पार्टी नं.२ |

(उपरोक्त पार्टीचा या विकसन करारपत्रामध्ये यापुढे संक्षिप्त रूपाने पार्टी नं. २ अथवा लिहून घेणार असा उल्लेख करणेत आलेला असून त्यामध्ये उपरोक्त पार्टीचा व तिचे ॲडमिनीस्ट्रेटर, व्यवस्थापक व सर्व प्रकारचे कायदेशीर इस्टेट वारसांचा अंतर्भाव करणे आलेला आहे.)

**कारणे इचलकरंजी मुक्कामी लिहून ठेवतो करार की,**

१) लिहून घेणार ही बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट व सोसायटी रजि.ॲक्ट खाली नोंदणी झालेल्या ट्रस्टकडून चालविले जाणारे विना अनुदान सेमी शासकीय तत्वावरील प्रायव्हेट महाविद्यालय आहे. सदर संस्थेचे रजिस्टर्ड ऑफिस इचलकरंजी येथे आहे.

२) लिहून घेणार ही बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट व सोसायटी रजि.ॲक्ट खाली नोंदणी झालेल्या ट्रस्टकडून चालविले जाणारे प्रायव्हेट कॉम्प्युटरचे शिक्षण देणारी संस्था आहे. रजिस्टर्ड ऑफिस इचलकरंजी येथे आहे.

३) लिहून देणार यांना कम्प्युटर शिक्षण व इतर कौशल्यविषयी प्रशिक्षण देणे विषयी ठरले आहे. त्याप्रमाणे लिहून घेणार व लिहून देणार यांचे दरम्यान चर्चा होवून लिहून देणार यांनी खालील अटीवर लिहून घेणार यांचे कॉलेजमध्ये चर्चा होवून विद्यार्थीनींना कॉम्प्युटर शिक्षण व इतर कौशल्यांचे प्रशिक्षण देणेविषयी ठरले आहे.

अ) सदर कराराची मुदत ही शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३ पासून सुरू होवून ती शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ पर्यंत असेल.

ब) कॉम्प्युटर शिक्षण देणेसाठी लागणारे कॉम्प्युटर व त्या अनुषंगाने लागणारी मशिनरी व स्पेअर्स पार्ट लिहून घेणार यांनी उपलब्ध करून देणेचे आहेत व लिहून देणार यांनी सर्व कॉम्प्युटर वापरलेस योग्य स्थितीत रिपेरींग करून त्याची योग्यप्रकारे देखभाल ठेवणेची आहे.

क) लिहून देणार यांनी लिहून घेणार कॉलेजच्या सोमवार ते शनिवार च्या वर्किंग आवर्स मध्ये लिहून देणार यांनी नेमलेल्या शिक्षकांकडून बी.कॉम,एम.कॉम.,बी.बी.ए. मधील विद्यार्थीना कॉम्प्युटर/संगणक अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देणे. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मुलाखतीचे तंत्र (Interview Technique), संभाषण कौशल्य (Communication Skill) यासंबंधी तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करणे व जॉब फेअरचे (Job fair) आयोजन करणे.

ड) लिहून घेणार यांचे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कॉम्प्युटरचे शिक्षण व इतर कौशल्ये शिकविणाऱ्या लिहून देणार यांनी नेमलेल्या शिक्षकांचे मानधन लिहून घेणार यांनी भागविणेचे आहे. त्यास लिहून देणार संस्था जबाबदार असणार नाही.

फ) लिहून देणार यांनी नेमलेल्या शिक्षकांनी लिहून घेणार यांचे कॉलेजमधील विद्यार्थीना शिकविलेल्या अभ्यासक्रमाचा लेखी रिपोर्ट तपशीलासह लिहून घेणाऱ्या कॉलेज प्रिन्सीपॉल/प्राचार्य यांचेकडे देणेचा आहे.

ग) लिहून देणार यांनी पुरविलेल्या सदर सेवेसाठी लिहून घेणाऱ्या महाविद्यालयाकडून ठराविक मानधन देण्यात येईल.

४) लिहून घेणार व लिहून देणार यांचेमध्ये काही अटी व शर्ती वरून काही वाद उपस्थित झालेस दोन्ही पार्टीजनी त्यासाठी लवाद नेमून त्याद्वारे वाद सोडवून घेणेचा आहे तसेच विद्यार्थी अगर पालकांच्या तक्रारी आलेस दोन्ही पार्टीजनी समक्ष बसून विद्यार्थी अगर पालकांच्या तक्रारीचे निवारण करणेचे आहे. सदर करार सुरळीतपणे पार पाडण्यासाठी दोन्ही पार्टीज एकमेकांना सहकार्य करणेचे आहे.

५) सदर करार रक्कम रूपये १००/—चे स्टॅम्पपेपरवर केला आहे. अस्सल करारपत्र लिहून घेणार यांचेकडे असून त्याची झेरॉक्स प्रत लिहून देणार यांचेकडे आहे.

६) सदर करार दोन्ही पार्टीजनी वाचून पाहिला आहे. समजावून घेतला आहे व त्यानंतर दोन साक्षीदारासमक्ष लिहून देणार व लिहून घेणार यांनी त्याखाली सह्या केल्या आहेत. सदर करार दोन्ही पार्टीजवर बंधनकारक राहील. म्हणून केला करार इचलकरंजी मुक्कामी सही तारीख ३०/०८/२०२२.

**श्री. सदिप धों. कल्याणकर**
**(संस्था प्रमुख)**
**श्री समर्थ एज्युकेशन सोसायटीचे,**
**श्री कॉम्प्युटर एज्युकेशन, इचलकरजी**

लिहून देणार :————————————
पार्टी नं. २ श्री समर्थ एज्युकेशन सोसायटी, इचलकरंजी तर्फे
प्रेसिडेंट, श्री संदिप धोंडिराम कल्याणकर

SHRI VENKATESH MAHAVIDYALAYA * ICHALKARANJI * VMI

लिहून घेणार :————————————
पार्टी नं. १ श्री ना.बा.एज्युकेशन सोसायटी यांचे
श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी तर्फे
प्राचार्य, डॉ.व्ही.ए.माने

**साक्ष :**

१) सौ. सोनल खंजिरे. ________

२) डॉ. सुनिता हंसराज आंबवडे